# अण्णांचे ब्लॉगआऊट!

## टीम फेरबदलाचे संकेत परुळेकरांनी परस्पर दिल्याने अण्णा नाराज

**नवी दिल्ली** | दि. ५ (वृत्तसंस्था)

**टीममधून** अरविंद केजरीवाल, किरण बेदी व प्रशांत भूषण यांना वगळण्यावर विचार करीत असल्याचे संकेत देणारे लेखन अण्णांच्या नावे त्यांच्या ब्लॉगवर टाकल्यानंतर नाराज झालेल्या अण्णांनी ब्लॉग बंद करीत असल्याची घोषणा आज येथे केली. राळेगणसिद्धी येथे परतल्यानंतर ब्लॉग बंद करण्याचे काम करू, असे ते पत्रकारांना म्हणाले.

अण्णांच्या ब्लॉगचे काम पत्रकार राजू परुळेकर बघत होते. परुळेकर यांनी अण्णांच्या ब्लॉगवर अण्णांच्या हस्ताक्षरातील पत्र आणि स्वतःचे टिपण टाकले. परुळेकर यांच्या टिपणामुळे वादाला तोंड फुटले आहे. केजरीवाल, बेदी, भूषण यांना टीम अण्णामधून वगळणार होते, असे परुळेकरांनी या ब्लॉगमध्ये अण्णांच्या हस्ताक्षरातील मजकुराचा हवाला देऊन म्हटले आहे. दि. २३ ऑक्टोबर २०११ रोजी दुपारी २.३० वाजता अण्णांनी आपल्याला ब्लॉगसाठी लिहिलेला स्वलिखित मजकूर सोपविला. त्यांनी केजरीवाल, ॲड. भूषण, किरण बेदी यांना टीम अण्णामधून काढण्यासाठी मनाची तयारी केली होती. मात्र, अण्णांचे सहकारी सुरेश पठारे यांनी हा मजकूर ब्लॉगवर टाकण्यास मला मनाई केली, असे परुळेकर यांनी म्हटले आहे.

> “ परुळेकर यांनी जर माझ्या हस्ताक्षरातील कुठलाही मजकूर ब्लॉगवर टाकला असेल, तर त्यावर माझी स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. आपण तोच मजकूर ग्राह्य धरायला हवा, ज्यावर माझी स्वाक्षरी आहे!
>
> – अण्णा हजारे



केजरीवाल, ॲड. प्रशांत भूषण व किरण बेदी हे गैर-लोकशाही तसेच फॅसिस्ट पद्धतीने काम करीत होते आणि ते अण्णांच्या विचारांचा सन्मान करीत नव्हते, असा आरोपही परुळेकर यांनी केला आहे.

'टीम अण्णावर सातत्याने आरोप करण्यात येत आहेत. आत्ताचा हा वाद या आरोपांच्या षड्यंत्राचाच तर भाग नाही?' असा सवालही अण्णा हजारे यांनी केला. आपण कोअर समिती भंग करण्याचा निर्णय घेतला होता काय, असे विचारले असता अण्णा म्हणाले, ''टीम अण्णावर जेव्हा गंभीर स्वरूपाचे आरोप झाले, तेव्हा अनेकदा हा विचार मनात आला होता. अनेकदा वाटले, टीममध्ये बदल करावा!''